दाखल तारीख : ०३.०८.२०२३.
नोंदणी तारीख : ०३.०८.२०२३.
निकाल तारीख : ०७.१२.२०२३.
**कालावधी : ०० व.०४ म.०४ दि.**

**जामनेर येथील ३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी– पी. व्ही. सुर्यवंशी)**

**नियमीत फौजदारी खटला क्रं. १५३/२०२३** (नि. क्र. ___)

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलिस ठाणे, पहुर ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**शेख सुफयान नाजीमोद्दीन.**
वय – २४ वर्षे, व्यवसाय – मजूरी,
रा. बडा मोहल्ला पहुर ता.जामनेर जि.जळगांव ... **आरोपी**

---

सरकारतर्फे अधिवक्ता – श्रीमती.आर.आर.चव्हाण.
फिर्यादीतर्फे अधिवक्ता – श्री.के.एच.चौधरी.
आरोपीतर्फे अधिवक्ता – श्री.एस.आर.पाटील.

---

## न्या य नि र्ण य

*(घोषित तारीख ०७.१२.२०२३)*

आरोपीविरुध्द या न्यायालयात भारतीय दंड संहिता कलम ३६३ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की –**

२. दिनांक ११.०९.२०२१ रोजी तक्रारदार सलीम शेख नियाज मोहंम्मद यांनी पोलीस ठाणे पहुर येथे तक्रार दाखल केली. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार दि.१०.०९.२०२१ रोजी शुक्रवार असल्याने दुपारी ०१:३० वाजेच्या सुमारास ते नमाज

पठणासाठी मज्जीदमध्ये गेले होते. त्यानंतर दुपारी ०२:०० वाजेच्या सुमारास फिर्यादी घरी परत आले असता त्यांना पुढच्या खोलीमधील कपाट उघडे दिसले व त्यातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले होते. फिर्यादीने कपाटात पाहिले असता दिड लाख रुपये, त्यांच्या पत्नीचे मंगळसुत्राची पोत, मुलगी खुशी हिचे आधारकार्ड असे दिसले नाही. त्यानंतर त्यांनी त्यांच्या पत्नीला विचारले की, मुलगी खुशी घरात दिसत नाही त्यानंतर त्यांच्या पत्नीने त्यांना सांगितले की, त्या मागील खोलीत नमाज पठण करीत होत्या व खुशी पुढच्या खोलीत होती व ती कुठे गेली त्यांना माहिती नाही. त्यानंतर फिर्यादीने मुलगी खुशी चा आजूबाजूच्या परीसरात शोध घेतला असता त्यांना माहिती मिळाली की, गल्लीतील सुफयान हा देखील दुपारी ०२:०० वाजल्यापासून घरातून कुठेतरी बाहेरगावी निघून गेला. सदरवेळी फिर्यादीची खात्री झाली की, सुफयान याने मुलगी खुशी हिला फुस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले. त्यानंतर फिर्यादीचा पुरवणी तपासटिपण नोंदविण्यात आला. सदर तपासटिपणमध्ये त्यांनी सांगितले की, दिड लाख रुपये त्यांना त्यांच्या घरातच दुस–या खोलीत गादीच्या खाली मिळून आले. सदर आशयाची फिर्यादीने तक्रार नोंदविली.

३. सदर तक्रारीवरुन अपराध क्र. ३२९/२०२१ पोलिस स्टेशन, पहुर येथे नोंद झाला. घटनेचा तपास पो.ह.श्री.प्रकाश पाटील यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा बनविला. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. संपूर्ण तपासाअंती प्रस्तुतच्या आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरुध्द नि.क्र.०८ खाली भारतीय दंड संहिता कलम ३६३ प्रमाणे दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोपातील मजकुर आरोपीला वाचुन दाखविला व समजावुन सांगितला असता आरोपीने गुन्हा मान्य नसल्याचे निवेदन केले व संपरिक्षेची मागणी केली म्हणुन खटल्याचे कामकाज पुढे चालू केले.

५. आरोपीने सदरचे अपराधाचे कृत्य केले आहे याच्या शाबितीसाठी अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविली. आरोपीविरुध्द पुरावा पटलावर न आल्यामुळे त्यांचे फौ.व्य.सं.कलम ३१३ मधील तरतुदीनुसार जबानी नोंदवली नाही. शेवटी सरकारी

अभियोक्ता श्रीमती.आर.आर.चव्हाण व बचाव पक्षाचे अधिवक्ता श्री.एस.आर.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

६. अभियोग पक्षाने सादर केलेला मौखिक व कागदोपत्री पुरावा व आरोपीने घेतलेला बचाव यांचे एकत्रितपणे काळजीपुर्वक अवलोकन केले असता खालील निर्णय प्रश्न उपस्थित झाले. त्या निर्णय प्रश्नांचे कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.१०.०९.२०21 रोजी दुपारी ०१:३० ते ०२:०० वाजेच्या दरम्यान बडा मोहल्ला पहुर पेठ येथून आरोपीने फिर्यादीच्या मुलीला त्यांच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळूवन नेल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

७. आरोपीने अपराधाचे कृत्य केले आहे याच्या शाबितीसाठी अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदवीली.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबत</u>:–**

८. अभियोग पक्षाने उपरोक्त सादर केलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे गुणदोषावर अवलोकन करण्यापुर्वी प्रामुख्याने नमुद करावे लागेल की, प्रचलित न्यायतत्व प्रणालीनुसार आरोपीचे अपराधाचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षावर असते.

९. साक्षीदार सलीम शेख हे फिर्यादी असुन त्यांची साक्ष पाहिली असता असे दिसुन येते की, त्यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. फिर्यादीने असे कथन केले आहे की, दि.१०.०९.२०२१ रोजी खुशी रागाच्या भरात घरातून निघून गेली होती. खुशी हिला आरोपीने पळून नेले असे काही घडले नसल्याचे फिर्यादीने कथन केले.

**१०.** फिर्यादीचा अभियोग पक्षातर्फे पुरेपुर उलटतपास घेण्यात आला परंतू त्यांचा काही एक उपयोग झाला नाही. अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेले सुचक प्रश्न फिर्यादीने नाकारले. फिर्यादीने असेही कथन केले की, खुशी हिचे लग्न झाले असून ती तिच्या सासरी नांदत आहे. फिर्यादीचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला सदर उलटतपासात फिर्यादीने असे कथन केले की, खुशी न्यायालयात साक्ष देण्यासाठी येवू शकत नाही कारण ती तिच्या सासरी नांदत आहे.

**११.** फिर्यादीने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरुध्द लावलेले दोषारोप निर्विवादपणे सिध्द करु शकत नाही. म्हणुन मी निर्णय प्रश्न क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे. म्हणुन आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. निर्णय प्रश्न क्र. २ च्या उत्तरादाखल मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. **आरोपी शेख सुफयान नाजीमोद्दीन** यांची फौजदारी व्यवहार संहिता कलम २४८ (१) मधील तरतुदीनुसार त्यांचेवर निश्चित करण्यात आलेल्या भारतीय दंड संहिता कलम ३६३ च्या अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात आले आहे.

३. आरोपीने फौजदारी व्यवहार संहिता कलम ४३७–अ अंतर्गत रक्कम रु. ५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व बंधपत्र न्यायालयात सादर करावे.

जामनेर
दिनांक ०७.१२.२०२३.

(पी. व्ही. सुर्यवंशी)
३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
जामनेर